# शासकीय तंत्रनिकेतन छत्रपती संभाजीनगर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
उस्मानपुरा, रेल्वे स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर - 431005
फोन: (कार्यालय) (0240) 2334724 / 2360781 (A.O.) 2345936, (P) 2353644
website: www.gpabad.ac.in
E-mail: : principal.gpaurangabad@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.शातंनिछसं/पवि/२०२५/ 213

दिनांक : २१/०६/२०२५

12 JUN 2025

## विद्यार्थ्यांना सूचना :

**विषय — उन्हाळी परीक्षा २०२५ साठी उत्तरपत्रिका गुणपडताळणी, छायांकित प्रत व पुनर्मुल्यांकनासाठीचे वेळापत्रक व ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची प्रक्रिये बाबत.**

(summer 2025 Examination: Schedule for Recounting, Photocopy & Reassessment of Answer Books)

उन्हाळी परीक्षा — २०२५ **(242)** लेखी परीक्षा दिलेल्या सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांना गुणपडताळणी **(Marks Recounting)** किंवा उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रत **(PhotoCopy)** पडताळून उत्तरपत्रिकांचे पुनर्मुल्यांकन **(Reassessment)** करावयाचे आहे, अशा विद्यार्थ्यांनी संस्थेच्या **www.gpabadmis.in** संकेतस्थळावर जावून स्वत:च्या **Login** मधून ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावयाचे आहेत. सदरील प्रक्रियेचे वेळ पत्रक खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कार्य तपशील | शुल्क | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | उत्तरपत्रिकांच्या पुर्नगुणपडताळणी (Recounting) करीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे. | रू. 100/- प्रति विषयाप्रमाणे. | दि. २३/०६/२०२५ ते दि. २६/०६/२०२५ |
| २ | उत्तरपत्रिकांची छायांकित प्रत / प्रती करीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे. (Photocopy of Answer Book) | रू. **300/-** प्रति विषयाप्रमाणे. | दि. २३/०६/२०२५ ते दि. २६/०६/२०२५ |
| ३ | ONLINE पध्दतीने पैसे भरल्याची पावती दाखवून स्थानिक मूल्यांकन (LAC) केंद्रामधून उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत (Photocopy of Answer Book) हस्तगत करणे. | -- | दि. ०१/०७/२०२५ ते दि. ०२/०७/२०२५ |
| ४ | Reassessment पुनर्मुल्यांकनासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे. | शुल्क रू. **500/-** प्रति विषयांप्रमाणे | दि. ०१/०७/२०२५ ते दि. ०३/०७/२०२५ |

ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया खाली प्रमाणे आहे.

१. **www.gpabadmis.in** संकेतस्थळावर जावून स्वत:चे **Login** करावे.
२. **Recounting / Photocopy / Reassessment** या पैकी आवश्यक त्या पर्याय निवडावा.
३. विद्यार्थ्याला सर्व विषय दिसुन येतील या पैकी आवश्यक त्या विषय निवडून **Submit** व **Confirm** करावे.
४. Submit **करण्या अगोदर विद्यार्थी अर्जा मध्ये बदल करु शकतील मात्र** Confirm **केल्या नंतर अर्जमध्ये कुठलाही बदल होणार नाही याची नोंद घ्यावी.**
५. **Confirm** केल्या नंतर **Pay Now** या टॅब व क्लिक करुन आवश्यक ते शुल्क भरावे.
६. शुल्क भरणा झाल्या नंतर विद्यार्थ्याच्या लॉगिन मध्ये भरलेला अर्ज व पावती दिसून येईल.
७. जो पर्यंत आपल्या लॉगिनमध्ये आपण भरलेली फीस **Receipt** दिसणार नाही. तोपर्यंत आपला फॉर्म **Submit** झाला किंवा **Payment Submit** झाले असे म्हणता येणार नाही, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

शुल्क भरल्याचा डाटा बँकेकडून अधिकृतरीत्या **Download** करून प्राप्त माहितीवरच विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांची फोटोकॉपी व पुनर्मुल्यांकन करण्यात येईल. ऑनलाईन रक्कम जमा केल्याची पावती विद्यार्थ्याने स्वत:च्या जवळच ठेवावी. काही त्रृटी असल्यास तसेच गरज पडल्यास पावतीची झेरॉक्स सादर करणे अत्यावश्यक आहे.

P.T.O.

**ज्या विद्यार्थ्यांनी फोटोकॉपी घेतली असेल तेच विद्यार्थी Reassessment साठी अर्ज करण्यास पात्र राहतील. त्यामुळे फोटोकॉपी न घेतलेल्या विद्यार्थ्यांना Reassessment साठी अर्ज करता येणार नाही. याची संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

उत्तरपत्रिकांच्या पुनर्गुणपडताळणी (Recounting), पुनर्मुल्यांकनाचा (Reassessment) निकाल जाहीर करणे व गुणात/निकालात बदल झाल्यामुळे विषय नोंदणीस पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश व विषय नोंदणी करीता स्वतंत्रपणे नव्याने सुचना निर्गमित करण्यात येईल.सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

**कुठल्याही परिस्थितीत रोखीने पैसे स्वीकारले जाणार नाहीत, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.**

प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, छत्रपती संभाजीनगर.

**प्रत-** सर्व विभागप्रमुख - स्थापत्य/यंत्र/स्वयंचल/विद्युत/अणुविद्युत/माहिती तंत्रज्ञान/संगणक/AN/डी.डी.जी.एम./ विज्ञान/ उपयोजितयंत्रशास्त्र /कर्मशाळा ग्रंथालय/वसतिगृह /प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी/ विद्यार्थी विभाग (कार्यालय).